वाचले- मा.आयुक्त सो यांचा दिनांक २८/७/२०१५ चा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका.
पिंपरी,पुणे१८.मध्यवर्ती भांडार विभाग
क्रमांक-मभां/८/कावि/६१८/२०१५.
दिं-. ३/८/२०१५.

विषय- भंगार (निरुपयोगी) साहित्याचा लिलाव करणेबाबत..

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागाने जुने/भंगार/निरुपयोगी भंगार साहित्य जमा करणेत आले आहे. सदर भंगार साहित्याचा एकत्रितपणे विल्हेवाट लावणेसाठी जाहिर लिलाव करणे प्रस्तावित असुन, सदरचे साहित्य नेहरुनगर येथील गोडावुन ,गवळीमाथा, कार्यशाळा, वाय.सी.एम रुग्णालय या ठिकाणी जमा करुन ठेवण्यात आलेले आहे.

प्रस्तुत लिलावाचे कामकाज नियंत्रण चालन व निर्णय घेणेकरीता खालील अधिका-यांची समिति नियुक्त करण्यात येत आहे.

लिलाव समिती सदस्य –

१) सह आयुक्त- अध्यक्ष
२) मुख्य लेखापरिक्षक- सदस्य
३) मुख्य लेखापाल- सदस्य
४) भांडार अधिकारी सदस्य सचिव
५) संबधित विभागाचा वर्ग -१ अधिकारी (ज्या त्या विभागातील भंगार साहित्य लिलावचे कामाकरिता मर्यादित)

प्रस्तुत समितीची कार्यकक्षा (व्याप्ती)

नियुक्त समितीची कार्यकक्षा (व्याप्ती) खालील प्रमाणे निश्चित करणेत येत आहे.

१. प्रस्तुत भंगार साहित्य प्रत्यक्ष पहाणी करुन विक्री करणेबाबतचा निर्णय घेणे.
२. प्राप्त मुल्यांकनाचे फेर अवलोकन करणे
३. संपुर्ण प्रक्रीयेचे चालन, नियंत्रण अंतिम निर्णय घेणे.
४ भांडार अधिकारी (भांडार ) यांना प्रस्तुत समितीचे सदस्य सचिव म्हणुन कामकाज करावयाचे आहे.
५.प्रस्तुत समितीची नेमणुक आदेशाच्या तारखेपासुन ०१ वर्षाकरिता ग्राह्य राहिल.

सबब, मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानरगपालिका या आदेशान्वये वरिलप्रमाणे लिलाव समितीची नेमणुक करीत असुन, भंगार निरुपयोगी साहित्याचा लिलाव संदर्भात सर्व निर्णय घेणेचे अधिकार नियुक्त समितीस देत आहे. प्रस्तुतचे अधिकारमध्ये बदल करणे अथवा निरस्त करणेचा हक्क मी स्वत:कडे राखून ठेवीत आहे.

सही/-
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – ४११०१८

प्रती-

१.मा.समिती अध्यक्ष/सदस्य
२. संबधित विभाग प्रमुख

प्रत-

१.मा.आयुक्त कक्ष- माहितीसाठी सादर
२.संबधित विभाग प्रमुख- माहिती साठी सादर